• वर्ष : ०३ • अंक : २१२ • पुणे • बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक





## थोडक्यात पण महत्वाचे




## महाराष्ट्रात ‘अँटी लँड ग्रॅबिंग कायदा’ लागू करण्याची मागणी

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्रात वाढत्या जमीन बळकाव प्रकरणांवर आळा घालण्यासाठी ‘अँटी लँड ग्रॅबिंग कायदा’ तातडीने लागू करावा, अशी मागणी नागरीक सोशल फाउंडेशन (NSF), पुणे यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात संस्थेकडून राज्य शासनाला सविस्तर निवेदन सादर करण्यात आले आहे आहे अशी माहिती संस्थेच्या सदस्या सीए अंजली खत्री यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी संस्थेचे विश्वस्त अमेय सप्रे, प्रीतम थोरवे, सीए. सर्वेश मेहंदळे आदि मान्यवर उपस्थित होते. या विषयी अधिक माहिती देताना खत्री म्हणाल्या, देशातील आंध्र प्रदेश, तेलंगणा, आसाम आणि कर्नाटक या राज्यांमध्ये अशा प्रकारचा कायदा आधीच लागू असून, त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही कठोर आणि प्रभावी कायद्याची गरज अधोरेखित करण्यात आली. नागरिक सोशल फाऊंडेशने शासनाकडे काही महत्त्वाच्या मागण्या मांडल्या आहेत. यामध्ये जमीन बळकावणे हा स्पष्टपणे फौजदारी गुन्हा घोषित करणे, संघटित गुन्हे व भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनमताने होणाऱ्या प्रकरणांवर कठोर शिक्षा करणे, तसेच अशा प्रकरणांसाठी विशेष आणि जलदगती न्यायालये स्थापन करणे यांचा समावेश आहे. तसेच न्याय मिळण्यासाठी निश्चित कालमर्यादा ठरविणे आणि तपास प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याची मागणीही करण्यात आली आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात सुमारे १०,००० हेक्टर गायरान जमीन आणि ६१,००० हेक्टर वनजमिनीवर अतिक्रमण झाले आहे. सध्याच्या कायद्यांमध्ये गुन्हेगारांमध्ये भीती निर्माण करण्याची क्षमता कमी असल्याने अशा गुन्ह्यांत वाढ होत असल्याचे खत्री यांनी नमूद केले. याशिवाय, सध्याच्या प्रक्रियेनुसार जमीन वादांमध्ये दिवाणी आणि फौजदारी असे स्वतंत्र खटले चालवावे लागतात, ज्यामुळे वेळ आणि खर्च वाढतो. न्यायालयीन प्रक्रियेतील विलंबामुळे अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात, याकडेही लक्ष वेधण्यात आले. सरकारी जमिनीवरील अतिक्रमणामुळे शासन व सामान्य नागरिकांचे मोठे नुकसान होत असल्याने, ‘अँटी लँड ग्रॅबिंग कायदा’ लागू केल्यास अशा प्रकरणांचा जलद निपटारा होऊन गुन्हेगारांवर प्रभावी अंकुश बसू शकतो, असा विश्वास संस्थेने व्यक्त केला.



## वसुंधरा दिनानिमित्त आदिवासी बांधवांचा जलसंधारण उपक्रम

पुणे (आरंभ पर्व) : जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधत सुयश चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने राज्यातील पुणे, नंदुरबार, वाशिम, गडचिरोली अशा विविध जिल्ह्यांमध्ये जलसंधारणाचा उल्लेखनीय उपक्रम राबविण्यात आला. जंगल परिसरातील नैसर्गिक जलस्रोत असलेल्या ओढ्यांवर आणि ओघळांवर स्थानिक शेतकरी व आदिवासी बांधवांनी एकत्र येत दगड, माती आणि सिमेंटच्या पोत्यांच्या साहाय्याने छोटे बंधारे उभारले. या उपक्रमामुळे वाहून जाणारे पाणी एका ठिकाणी साठवले जात असून, परिसरातील भूजलपातळी वाढण्यास मदत होत आहे. तसेच पाण्याची उपलब्धता वाढल्याने जंगलातील जैवविविधतेला मोठा आधार मिळत आहे. पाणी साठवणुकीमुळे विविध वनस्पतींची वाढ होऊन पशु-पक्षी व जलचरांना नैसर्गिक अधिवास उपलब्ध होत आहे. परिणामी, पर्यावरण संवर्धनासह स्थानिक शेती व्यवस्थेलाही याचा थेट फायदा होत असल्याचे दिसून येत आहे. या उपक्रमात स्थानिक ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. पारंपरिक ज्ञान आणि सामूहिक श्रम यांच्या बळावर उभारण्यात आलेले हे बंधारे पर्यावरणपूरक आणि टिकाऊ ठरत आहेत. ग्रामीण व आदिवासी भागात जलसंधारणाचे महत्त्व अधोरेखित करणारा हा प्रयत्न इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. सुयश चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष यशवंत घैसास व स्मिता घैसास आणि कार्याध्यक्ष शलाका घैसास यांनी या उपक्रमाची माहिती देताना सांगितले की, “निसर्गाशी सुसंगत राहून जलस्रोतांचे जतन करणे ही काळाची गरज आहे. अशा उपक्रमांमुळे पर्यावरण रक्षणास चालना मिळते.”

## स्प्राइटचा ‘लेमन मिंट’ फ्लेवर लाँच; उन्हाळ्यात देणार ताजेतवाने थंडावा




नवी दिल्ली (आरंभ पर्व) : उन्हाळा सुरू होताच थंडावा देणाऱ्या पेयांची मागणी वाढते. भारतीयांच्या याच आवडीला लक्षात घेऊन Sprite ने ‘स्प्राइट लेमन मिंट’ हा नवा आणि अद्वितीय फ्लेवर बाजारात आणला आहे. लिंबू आणि पुदिन्याच्या पारंपरिक चवीला आधुनिक रूप देत हा पेयप्रकार ग्राहकांना ताजेपणाचा नवा अनुभव देणार आहे. भारतात पुदिन्याचा वापर थंडावा मिळवण्यासाठी पारंपरिक पद्धतीने केला जातो. त्याच संकल्पनेला अनुसरून स्प्राइटने आपल्या सिग्नेचर लेमन-लाइम चवीत पुदिन्याचा थंडावा मिसळत एक वेगळा फ्लेवर सादर केला आहे. यामुळे ओळखीची चव आणि नावीन्य यांचा उत्तम संगम साधण्यात आला आहे. या नवीन उत्पादनाच्या प्रचारासाठी तयार करण्यात आलेल्या जाहिरातीत अभिनेता Sunil Grover प्रमुख भूमिकेत असून, ब्रँडच्या ‘थंड रख’ या संकल्पनेला विनोदी आणि वास्तवदर्शी पद्धतीने सादर करण्यात आले आहे. दैनंदिन जीवनातील ताणतणावाच्या प्रसंगांमध्ये शांत राहण्याचा संदेश या मोहिमेद्वारे देण्यात आला आहे. Coca-Cola India च्या स्पार्कलिंग फ्लेवर्स कॅटेगरी हेड सुमेली चॅटर्जी यांनी सांगितले की, ग्राहक आधीपासूनच स्प्राइट आणि पुदिन्याचे मिश्रण करून प्रयोग करत होते. त्यातून प्रेरणा घेऊन ‘स्प्राइट लेमन मिंट’ तयार करण्यात आले आहे. आयकॉनिक चवीत पुदिन्याचा ट्विस्ट देत बहु-संवेदी थंडावा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. जाहिरात मोहिमेबाबत क्रिएटिव्ह टीमनेही सांगितले की, भारतातील विविध हवामान परिस्थितीत लोकांना त्वरित थंडावा देणारा पर्याय म्हणून या उत्पादनाची संकल्पना तयार करण्यात आली आहे. ‘मिंट लगा’ हे ब्रीदवाक्य या उत्पादनाच्या भावनेला अचूकपणे व्यक्त करते. ही मोहीम सोशल मीडियासह रिटेल स्टोअर्समध्येही मोठ्या प्रमाणावर राबवली जाणार असून, विशेष मांडणीद्वारे ग्राहकांचे लक्ष वेधले जाणार आहे. निवडक बाजारपेठांमध्ये उपलब्ध असलेले ‘स्प्राइट लेमन मिंट’ हे मर्यादित कालावधीसाठीच विक्रीसाठी उपलब्ध असणार आहे.

# इनामी देवस्थान जमिनींसाठी स्वतंत्र कायदा अंतिम टप्प्यात

## मसुदा १५ दिवसांत शासन पोर्टलवर; अधिवेशनात मांडण्याची तयारी – महसूल मंत्री बावनकुळे

### आमदार शेखर निकम यांच्या प्रयत्नाने मंत्रालयात विशेष बैठकीचे आयोजन

मुंबई (दै. आरंभ पर्व)

कोकणातील इनामी देवस्थान जमिनींच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी राज्य सरकारकडून स्वतंत्र व सुस्पष्ट तरतुदी असलेला नवीन कायदा आणण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. पुढील १५ दिवसांत या कायद्याचा मसुदा शासनाच्या पोर्टलवर प्रसिद्ध करून संबंधितांकडून हरकती व अभिप्राय मागवले जाणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. मंत्रालयात मंगळवारी शेखर निकम यांच्या मागणीनुसार आयोजित विशेष बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर करण्यात आला. बैठकीस महसूल आयुक्त, जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार तसेच पेढे-परशुराम येथील



ग्रामस्थ उपस्थित होते. पेढे-परशुराम येथील इनामी देवस्थान जमिनींचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या पार्श्वभूमीवर आमदार निकम यांनी बैठकीत ठाम भूमिका मांडत सांगितले की, अनेक शेतकरी व कुळे पिढ्यान् पिढ्या जमीन कसत असले तरी त्यांच्या नावावर मालकी नोंद नसल्याने कर्ज, अनुदान, पीकविमा तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यात अडथळे निर्माण होत आहेत.यावेळी शेतकरी उत्कर्ष समितीचे अध्यक्ष सुनील गमरे, उपाध्यक्ष गजानन भोसले, सचिव अमोल वारे, संघटक प्रमोद माळी आदी उपस्थित होते. या बैठकीत मंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले की, देवस्थान जमिनी कुळांच्या नावाने करण्यासाठी स्वतंत्र कायदा आणण्यात येणार आहे. मसुदा प्रसिद्ध झाल्यानंतर प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करून सुधारित विधेयक आगामी अधिवेशनात मंजुरीसाठी मांडले जाईल. तसेच पेढे-परशुराम गावातील जमिनींसंदर्भातील सर्व आदेश व अभिलेख तातडीने सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. बैठकीत रत्नागिरी जिल्ह्यातील इतर महसुली प्रश्नांवरही चर्चा झाली. जिल्ह्यात आंबा, काजू यांसारख्या फळबागांची संख्या मोठी आहे. नेटवर्कअभावी दरवर्षी ई-पीक पाहणी करणे बागायतदारांसाठी गैरसोयीचे ठरत असल्याची बाब आमदार निकम यांनी मांडली. यावर मंत्री बावनकुळे यांनी जमाबंदी आयुक्त, पुणे तसेच कृषी आयुक्त, पुणे यांनी फळपिकांच्या वयोमर्यादेचा विचार करून ई-पीक पाहणी दरवर्षीऐवजी तीन वर्षांतून एकदा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावा, असे निर्देश दिले.

### रोपवाटिकांसाठी मातीवर रॉयल्टीमुक्तीचा विचार

**जिल्ह्यातील रोपवाटिकांना लागणाऱ्या मातीवर महसूल खात्याकडून रॉयल्टी व दंड आकारला जात असल्याने रोपवाटिकाधारक आणि शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा मुद्दाही आमदार निकम यांनी उपस्थित केला. यावर मंत्री बावनकुळे यांनी रोपवाटिकांसाठी लागणारी माती विना रॉयल्टी व विना दंड उपलब्ध करून देण्यासाठी विशेष धोरण आखण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने प्रस्ताव सादर करावा, असे आदेश दिले कोकणातील शेतकरी, कुळे आणि बागायतदारांच्या दृष्टीने या बैठकीतील निर्णयांना महत्त्व प्राप्त झाले असून, इनामी देवस्थान जमिनींच्या प्रश्नावर लवकरच ठोस तोडगा निघण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.**

## ३,४०० नवीन 5G साइट्ससह आपल्या नेटवर्कचा विस्तार

पुणे (दै. आरंभ पर्व)

भारतातील आघाडीच्या दूरसंचार सेवा प्रदाता कंपन्यांपैकी एक असलेल्या भारती एअरटेलने आज घोषणा केली की, मागील 12 महिन्यांत महाराष्ट्र आणि गोव्यात 3,400 हून अधिक नवीन 5G साइट्स उभारण्यात आल्या आहेत, ज्यामुळे ग्राहकांना अधिक वेगवान इंटरनेट, व्यापक कव्हरेज आणि सुधारित नेटवर्क अनुभव मिळत आहे. “महाराष्ट्र आणि गोव्यात डेटा वापराची मागणी वेगाने वाढत आहे, आणि आमचे उद्दिष्ट या मागणीपेक्षा पुढे राहण्यासाठी सतत आमचे नेटवर्क अधिक मजबूत करणे आहे. 3,400 हून अधिक नवीन 5G साइट्स जोडल्यामुळे आम्ही 2.2 कोटीहून अधिक ग्राहकांना अधिक वेगवान स्पीड, व्यापक कव्हरेज आणि अधिक विश्वासार्ह अनुभव देत आहोत.




विशेषतः विकासशील जिल्ह्यांमध्ये आमची सातत्यपूर्ण गुंतवणूक, कनेक्टिव्हिटीतील कमतरता दूर करून भविष्याभिमुख नेटवर्कच्या माध्यमातून प्रदेशाच्या डिजिटल विकासाला बळकटी देण्याच्या एअरटेलच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे,” असे रबी शंकर मिश्रा, सीईओ, महाराष्ट्र व गोवा, भारती एअरटेल यांनी सांगितले.

## फसलेला आणि रटाळ सिनेमा : “सालबर्डी”

(दै. आरंभ पर्व)

ग्रामीण पार्श्वभूमीवर आधारित क्राईम-सस्पेन्स थ्रिलर म्हणून “सालबर्डी” हा चित्रपट प्रेक्षकांसमोर येतो. अहिल्यानगर जिल्ह्यातील एका छोट्या गावात घडणाऱ्या रहस्यमय घटनांवर आधारित ही कथा असून, लहान मुलांच्या बेपत्ता होण्याच्या मालिकेमुळे संपूर्ण गावात भीतीचं वातावरण निर्माण होतं. या प्रकरणाच्या तपासासाठी आलेली महिला पोलीस अधिकारी आणि तिच्या तपासाची दिशा याभोवती चित्रपटाची कथा फिरते.



**प्रतिक गंगणे**
**थेटरातल्या गप्पा**

**कथानक व मांडणी :** चित्रपटाचा विषय अत्यंत गंभीर आणि प्रभावी आहे. सत्य घटनांवर आधारित असल्याचा दावा केला जातो, त्यामुळे सुरुवातीला प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण होते. मात्र, कथानकाची मांडणी आणि सादरीकरणात सातत्याचा अभाव जाणवतो. तपास प्रक्रियेत अपेक्षित असलेली थरारकता, ताण आणि लॉजिक अनेक ठिकाणी कमी पडताना दिसते. अनेक प्रसंग अचानक कट होतात, वेळेचा संदर्भ स्पष्ट होत नाही, त्यामुळे कथा तुटक वाटते.

**अभिनय :** पूजा सावंत यांनी मुख्य भूमिका साकारली असली तरी त्यांच्या संवादफेकीत आणि अभिनयात नाटकीपणा अधिक जाणवतो.

- रेटिंग : १.५ / ५

पोलीस अधिकाऱ्याची गंभीरता आणि वास्तववादी दृष्टिकोन पूर्णपणे उमटत नाही. इतर कलाकारांनीही आपापल्या भूमिका निभावल्या असल्या तरी पात्रांची खोली आणि प्रभाव कमी जाणवतो.

**दिग्दर्शन व पटकथा :** दिग्दर्शन आणि पटकथेतील कमतरता हा चित्रपटाचा मोठा तोटा ठरतो. कथानक हातात असूनही त्याची प्रभावी मांडणी करण्यात अपयश आले आहे. अनावश्यक प्रसंग, पुनरावृत्ती होणारे दृश्य आणि तर्कशुद्धतेचा अभाव यामुळे चित्रपटाचा वेग मंदावतो. तपास प्रक्रियेत अनेक ‘लूपहोल्स’ जाणवतात, जे प्रेक्षकांना खटकतात.

**संगीत व तांत्रिक बाजू :** चित्रपटातील पार्श्वसंगीत (BGM) हा एक मोठा नकारात्मक मुद्दा ठरतो. अनेक ठिकाणी अनावश्यक हॉरर इफेक्ट्स वापरले गेले असून, ते कथेला पूरक न वाटता त्रासदायक ठरतात. काही दृश्यांमध्ये छायाचित्रण ठीक असले तरी रात्रीच्या दृश्यांमध्ये प्रकाशयोजना डोळ्यांना खटकणारी आहे.

**सकारात्मक बाजू :** चित्रपटातील “जगदंबे” हे गाणं आणि त्यातील विशेष उपस्थिती ही काही प्रमाणात लक्षवेधी ठरते. तसेच, मूळ विषयामध्ये दमदार कथा होण्याची क्षमता होती, हे जाणवतं.

**“सालबर्डी” हा विषय चांगला असूनही सादरीकरणात अपयशी ठरलेला चित्रपट आहे. प्रभावी कथा, मजबूत पटकथा आणि वास्तववादी दिग्दर्शन असते, तर हा चित्रपट अधिक प्रभावी ठरला असता. सध्या मात्र, तो प्रेक्षकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात कमी पडतो.**

## ISO मानांकनासह गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव





### बराटे म.न.पा. शाळा क्र. १६१ मध्ये उत्साहात कार्यक्रम

पुणे (दै. आरंभ पर्व)

वारजे कर्वेनगर परिसरातील कै. शामराव श्रीपती बराटे म.न.पा. शाळा क्रमांक 161 (मराठी माध्यम) या शाळेला I.S.O. मानांकन प्राप्त झाल्याच्या पार्श्वभूमीवर आज दि. 21 एप्रिल 2026 रोजी शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास शिक्षण समिती अध्यक्ष श्री. अरुण राजवाडे, नगरसेविका मा. सायलीताई वांजळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच वारजे कर्वेनगर विभागाचे सहाय्यक प्रशासकीय अधिकारी श्री. सचिन काळे, I.S.O. प्रतिनिधी श्री. लक्ष्मीकांत साधू, माजी नगरसेविका सौ. दिपालीताई धुमाळ, पुणे शहर अध्यक्ष (चित्रपट कामगार आघाडी, भाजप) श्री. राजीव पाटील, सामाजिक कार्यकर्ते श्रीकृष्ण बराटे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ. ज्योती देसकर व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात लेझीम, सूर्यनमस्कार, थ्रोबॉल, लोकनृत्य, नाट्यस्पर्धा व समूहगीत अशा विविध स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच शाळेला I.S.O. मानांकन मिळवून देण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. विभागीय पर्यवेक्षिका सौ. अनिता रेंगडे व शैक्षणिक संघटक श्री. महेश तिकोणे यांनी शाळेच्या कार्याचे कौतुक करत अभिनंदन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, नियोजन व आयोजन मुख्याध्यापिका सौ. संध्या शिंदे यांनी शिक्षकांच्या सहकार्याने केले. सूत्रसंचालन सौ. अर्चना कापडणीस व कु. प्रियांका मारणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. दिनेश भालके यांनी केले. शाळेच्या या यशस्वी वाटचालीमुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांसाठी ही अभिमानाची बाब ठरली आहे.

## आधुनिक यकृत उपचार आणि प्रत्यारोपणावर सीएमई आयोजित

पुणे (दै. आरंभ पर्व)

जागतिक यकृत दिनानिमित्त नोबल हॉस्पिटल्स अॅन्ड रिसर्च सेंटर तर्फे नुकतेच अॅडव्हान्स्ड लिव्हर केअर अॅन्ड ट्रान्सप्लांट सीएमई - प्रोसेसेस,प्रोटोकॉल्स अॅन्ड केस बेस्ड लर्निंग चे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये 200 हून अधिक फिजिशियन्स व शल्यचिकित्सकांनी भाग घेतला.उद्घाटनप्रसंगी नोबल हॉस्पिटल्स अॅन्ड रिसर्च सेंटरचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.दिलीप माने,उपव्यवस्थापकीय संचालक डॉ.दिविज माने आदी मान्यवर उपस्थित होते.या सीएमई कार्यक्रमात यकृत प्रत्यारोपण, पारंपरिक इमेजिंग पलीकडे जाऊन फॅटी लिव्हरचे निदान, क्रॉनिक लिव्हर डिसीज, लिव्हर सिऱ्हॉसिस अशा अनेक विषयांचा समावेश होता. नोबल हॉस्पिटल्स अॅन्ड रिसर्च सेंटर मधील यकृत प्रत्यारोपण




शल्यचिकित्सक डॉ.स्मिता पारेख यांनी योग्य व अचूक निदान आणि रूग्ण परिणाम सुधारण्यासाठी प्रमाणित प्रोटोकॉल्सचा अवलंब यावर भर दिला. नोबल हॉस्पिटल्स अॅन्ड रिसर्च सेंटरचे समूह कार्यकारी अधिकारी डॉ.संजय पठारे म्हणाले की,यकृताचे आजार विशेष करून फॅटी लिव्हर आणि सिऱ्हॉसिस या मोठ्या आरोग्य समस्या म्हणून उदयास येत आहेत.त्यामुळे योग्य निदान आणि बहुशाखीय दृष्टीकोन महत्त्वाचा आहे.

## सचिवपदी जेष्ठ कायदेतज्ञ अॅड. माणिक वायाळ बिनविरोध

राजगुरूनगर-किरण खुडे
(दै. आरंभ पर्व)

राजगुरूनगर येथील खेड बार असोसिएशनच्या सचिवपदी जेष्ठ कायदेतज्ञ अॅड. माणिक वायाळ यांची बिनविरोध निवड झाली.

खेड बार असोसिएशनची सभा येथील सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी अध्यक्ष, उपाध्यक्ष व लोकल ऑडीटर या पदांसाठी निवडणूक प्रक्रिया राबविण्याचे निश्चित करण्यात आले. याप्रसंगी निवडणुक निर्णय समिती आणि खेड बार असोसिएशनचे मावळते अध्यक्ष अॅड. वैभव कर्वे व इतर कार्यकारिणी तसेच जेष्ठ सदस्यांनी सर्वानुमते सचिव पदासाठी अॅड. माणिक वायाळ यांचे नाव सुचविले. त्यांना सभेने तात्काळ मान्यता दिली. अॅड. वायाळ यांनी यापुर्वी खजिनदार व कार्यकारीणी सदस्य या पदांवर काम केलेले आहे. यापुर्वीही ते खजिनदार व कार्यकारीणी सदस्य या दोन्ही पदांवर



बिनविरोध विजयी झाले होते. अॅड. वायाळ हे गुळाणी (ता खेड) या गावचे असून विविध सामाजिक उपक्रमात सक्रीय असतात. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

## IMGC आणि बजाज हाउसिंग फायनान्स लिमिटेडची भागीदारी

पुणे (दै. आरंभ पर्व)

भारताची पहिली मॉर्गेज गॅरंटी कंपनी, इंडिया मॉर्गेज गॅरंटी कॉर्पोरेशन (IMGC) ने बजाज हाउसिंग फायनान्स लिमिटेड (BHFL) — जी भारतातील सर्वात मोठी ठेव न स्वीकारणारी HFC असून मॉर्गेज उत्पादनांची संपूर्ण श्रेणी उपलब्ध करून देते — यांच्याशी धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली आहे. या भागीदारीचे उद्दिष्ट देशभरातील वंचित वर्ग आणि प्रथमच घर खरेदी करणाऱ्या नागरिकांसाठी गृहकर्जाची जबाबदार उपलब्धता वाढवणे हे आहे.



या सहकार्यामुळे IMGC ची पतजोखीम संरक्षणातील तज्ज्ञता आणि BHFL ची मजबूत वितरण व अखेरच्या टप्प्यापर्यंत कर्ज देण्याची क्षमता एकत्र येते. त्यामुळे सीमित पतइतिहास असलेल्या किंवा अनौपचारिक उत्पन्न असलेल्या कर्जदारांना — जे आतापर्यंत औपचारिक गृहवित्तापासून वंचित होते — त्यांना या सेवेत सामावून घेणे शक्य होईल. भारताच्या परवडणाऱ्या गृहनिर्माण क्षेत्रात, विशेषत: स्वयंरोजगारी व्यक्ती आणि अनौपचारिक कामगारांमध्ये, कर्जाची मोठी तफावत कायम आहे. या भागीदारीद्वारे, बजाज हाउसिंग फायनान्स मॉर्गेज गॅरंटी-आधारित समाधानांचा वापर करून गृहकर्जाची उपलब्धता वाढवेल — ज्यामध्ये 'संभव लोन' या उत्पादनाचाही समावेश आहे, जे अनौपचारिक उत्पन्न असलेल्या किंवा सीमित पतइतिहास असलेल्या ग्राहकांसाठी विशेषतः तयार केलेले परवडणारे गृहनिर्माण उत्पादन आहे — आणि त्याच वेळी जबाबदार कर्जाचे जोखीम अनुशासन देखील टिकवून ठेवेल. या भागीदारीमुळे IMGC ला परवडणाऱ्या गृहनिर्माण क्षेत्रात आपला विस्तार करणे, अधिक सर्वसमावेशक गृहवित्त परिसंस्था विकसित करणे आणि संपूर्ण भारतातील गृहकर्जाची मोठी तफावत भरून काढण्यास मदत होईल. या भागीदारीवर बोलताना IMGC चे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. महेश मिश्रा म्हणाले: "बजाज हाउसिंग फायनान्ससोबतची ही भागीदारी वंचित घटकांसाठी गृहवित्ताची उपलब्धता वाढवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. मॉर्गेज गॅरंटी कर्जदात्यांना विश्वासाने कर्ज देण्यास आणि त्याचवेळी मजबूत जोखीम अनुशासन राखण्यास सक्षम करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.







दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६












## पुणे ऑब्स्टेट्रिक अँड गायनॅकोलॉजिकल सोसायटीची नवीन कार्यकारिणी

### ४१व्या इन्स्टॉलेशन सीएमईचा भव्य सोहळा संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे ऑब्स्टेट्रिक अँड गायनॅकोलॉजिकल सोसायटी (पीओजीएस) च्या ४१व्या इन्स्टॉलेशन सीएमईचा भव्य सोहळा नुकताच अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर पार पडला. याप्रसंगी नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ पार पडला. प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ व बारामती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या माजी विभागप्रमुख डॉ. उमा वानखेडे यांनी पीओजीएसच्या अध्यक्षपदाची धुरा स्वीकारली. त्यांच्यासोबतच नामांकित स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. चारुलता बापये यांनी सचिवपद स्वीकारले. नवीन कार्यकारिणी मध्ये डॉ. वैजयंती पटवर्धन (उपाध्यक्ष), डॉ. मीनाक्षी देशपांडे (कार्यकारी उपाध्यक्ष), डॉ. अर्चना पुंगलिया (क्लिनिकल सेक्रेटरी) आणि डॉ. अमोल लुंकड (खजिनदार) यांचा समावेश आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या प्र-कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, विशेष अतिथी द फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँन्ड गायनेकोलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया (फॉग्सी) चे अध्यक्ष डॉ. भास्कर पाल आणि एएमओजीएस चे अध्यक्ष डॉ. अमेय पुरंदरे आदी मान्यवर उपस्थित होते. याबरोबरच पुणे शहरातील सर्व माजी अध्यक्ष आणि नामवंत स्त्रीरोगतज्ज्ञ उपस्थित होते.

याच सोहळ्याच्या निमित्ताने प्रगती २०२६ - स्टे करंट, स्टे अहेड या ज्ञानवर्धक शैक्षणिक परिषदेचेही उद्घाटन करण्यात आले. या परिषदेत विविध चर्चासत्रे, विचारप्रवर्तक वादविवाद सत्रे, दैनंदिन क्लिनिकल प्रॅक्टिससाठी मार्गदर्शन, प्राध्यापक अंजनेयुलू ओरेशन आणि डॉ. ए. व्ही. उमराणीकर ओरेशन यांचा समावेश होता.

## जिल्हाधिकारी कार्यालयात नागरिकांच्या तक्रारींचा पाढा

**सिंधुदुर्ग/देवगड (दै. आरंभ पर्व)**

देवगड तालुक्यातील मिठबावं येथील नागरिकांच्या प्रलंबित तक्रारी आणि मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे अधिकृत सदस्य माननीय अमितजी आदमाने यांनी आक्रमक पवित्रा घेत शोषित-पीडितांना न्याय मिळवून दिला आहे. आदमाने यांनी सिंधुदुर्गच्या अप्पर जिल्हाधिकारी मा. शुभांगी साठे मॅडम यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली, ज्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देऊन नागरिकांच्या अडचणींचे निवारण केले. मिठबावं येथील ग्रामस्थांना त्यांच्या सनदी अधिकाराप्रमाणे सेवा मिळण्यात अडचणी येत होत्या. अनेक तक्रारी शासन दरबारी प्रलंबित असल्याने नागरिकांमध्ये असंतोष होता. याप्रकरणी मानवाधिकार आयोगाचे डॅशिंग नेतृत्व अमित आदमाने यांनी पुढाकार घेतला. त्यांनी




### अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडून तत्काळ निवारणाचे आदेश

अप्पर जिल्हाधिकारी शुभांगी साठे यांची भेट घेऊन संविधानाने दिलेल्या मानवी हक्कांची पायमल्ली होत असल्याचे निदर्शनास आणून दिले.

अप्पर जिल्हाधिकारी शुभांगी साठे यांनी तक्रारींचे गांभीर्य ओळखून केवळ आश्वासनच दिले नाही, तर जागीच प्राथमिक आदेश निर्गमित करून नागरिकांच्या अडचणी सोडवण्यास सुरुवात केली. "यापुढेही काही अडचणी आल्यास थेट संपर्क साधा, आम्ही नक्कीच न्याय मिळवून देऊ," असा शब्द देत त्यांनी पीडित नागरिकांना मोठा आधार दिला. या सकारात्मक निर्णयाबद्दल जिल्हाधिकारी व त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांचे ग्रामस्थांनी आभार मानले आहेत.

याप्रसंगी विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते, ज्यात प्रामुख्याने नानासाहेब अवचिते: संस्थापक अध्यक्ष, ज्यागवार ग्रुप ऑल इंडिया. गणेशजी पवार: सामाजिक कार्यकर्ते (मिठबावं/पुणे). नितीन भरम: संस्थापक अध्यक्ष, सत्य शिव शंभु मराठा स्वराज्य प्रतिष्ठान राजगड. मिठबावकर सर: कोतवाल, मिठबावं तलाठी कार्यालय.

यावेळी मिठबावं, देवगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक ग्रामस्थ व कार्यकर्ते उपस्थित होते. अमित आदमाने यांच्या या प्रयत्नांमुळे पीडित नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून प्रशासनाच्या कार्यतत्परतेचेही कौतुक होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### ह्युंदाई मोटर इंडिया लि.तर्फे नवीन वेन्यू नाईट सादर

पुणे (आरंभ पर्व) : ह्युंदाई मोटर इंडिया लि.(एचएमआयएल) तर्फे ह्युंदाई वेन्यू नाईट सादर करण्यात आली असून स्टाईलची एक ठळक आणि गतिमान अभिव्यक्ती आहे.यामध्ये अनेक वैशिष्टये असून ब्लॅक पेंटेंड फ्रंट रेडिएटर ग्रील, मॅट ब्लॅक फ्रंट व रेअर ह्युंदाई लोगो,ब्लॅक स्कीड प्लेटस,ब्लॅक पेंटेंड रूफ रेल्स,ब्लॅक पेंटेड ओआरव्हीएम,ब्लॅक पेंटेड अलॉईज,रेड ब्रेक कॅलिपर्स,एक्सक्लुझिव्ह नाईट एमब्लेम,ऑल ब्लॅक इंटिरिअर्स विथ ब्रास कलर्ड इनसर्टस्, एक्सक्लुझिव्ह ब्लॅक सीट अपहोल्सट्री यांचा समावेश आहे. ह्युंदाई वेन्यू नाईट ही पेट्रोल आणि डिझेल पॉवरट्रेन्सच्या निवडक श्रेणीत उपलब्ध आहे.याशिवाय ह्युंदाई मोटरने ह्युंदाई वेन्यू साठी नवीन हेझल ब्ल्यू मॅट आणि मिस्टीक सफायर मॅट हे रंग सादर केले आहेत.

### शिवसेना सर्वसामान्य लोकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर : उदय सामंत

पुणे (आरंभ पर्व) : "सर्वसामान्य माणसाच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी वेळोवेळी त्यांना मदतीचा हात देण्याचा धर्म शिवसेना पक्षाने पाळलेला आहे. धर्मवीर आनंद दिघे अखेरच्या श्वासापर्यंत सामान्यांसाठी कार्यरत होते. त्यांच्याच नावाने शिवसेना नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून 'धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्ष' ही लोकचळवळ सुरु झाली आहे. पुण्यातील नागरिकांना या कक्षाचा चांगला लाभ होईल व शिवसेनेची सामान्य लोकांप्रती असलेली बांधिलकी अधिक घट्ट होईल," असे प्रतिपादन उद्योग तथा मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी केले. अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तवर धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षाचे राज्य प्रमुख व शिवसेनेचे राज्य निवडणूक समन्वयक वैभव वाघ यांच्या पुढाकाराने धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षाचे उद्घाटन सामंत यांच्या हस्ते झाले. सारसबागेजवळील शिवसेना भवनात आयोजित या कार्यक्रमावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, शहरप्रमुख प्रमोद उर्फ नाना भानगिरे, सहसंपर्क प्रमुख अजय भोसले, रमेश कोंडे, सुधीर कुरूमकर, आबा बागुल यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिवसैनिकांचा गौरव करण्यात आला. तसेच ठाण्यातील टेम्भीनाक्यावरील देवीचे पूजन व शासकीय योजनांची दहीहंडी फोडण्यात आली.

### खेलोमोर तर्फे पुण्यातील खेळाच्या ठिकाणांच्या बुकिंगमध्ये लक्षणीय वाढ



पुणे (आरंभ पर्व) : खेळासाठीची ठिकाणे शोधण्यासाठी आणि बुक करण्यासाठी आघाडीचे व्यासपीठ असलेल्या खेलोमोर ने पुण्यातील मैदान बुकिंगमध्ये लक्षणीय वाढ झाल्याची घोषणा केली आहे. सध्या पुण्यात त्यांच्याकडे सुमारे २३४ ठिकाणे उपलब्ध आहेत. ही वाढ चांगले आरोग्य व तंदुरुस्तीकरिता सक्रिय जीवनशैलीची वाढती संस्कृती दर्शवते, तसेच परिसरात सुलभ आणि उच्च दर्जाच्या क्रीडा सुविधांची वाढती मागणीही अधोरेखित करते. गेल्या काही महिन्यांत खेलोमोरने पुण्यात वापरकर्त्यांच्या सक्रियतेत लक्षणीय वाढ नोंदवली आहे. खेळाडू आणि क्रीडाप्रेमी फुटबॉल, क्रिकेट, बॅडमिंटन यांसारख्या विविध खेळांसाठी मैदाने, टर्फ्स आणि कोर्ट्स बुक करण्यासाठी वाढत्या प्रमाणात या प्लॅटफॉर्मचा वापर करत आहेत.

## आजची तरुण पिढी आणि विवाहसंस्था

### भीतीपासून समजूतदारपणाकडे जाणारा प्रवास

**(दै. आरंभ पर्व)**

**आजच्या बदलत्या सामाजिक रचनेत तरुण पिढीच्या विचारसरणीत मोठा बदल दिसून येतो आहे. करिअर, स्वातंत्र्य, आत्मसन्मान आणि मानसिक शांतता या गोष्टींना प्राधान्य देणारी ही पिढी पारंपरिक विवाहसंस्थेकडे नव्या दृष्टीकोनातून पाहत आहे. घरातील सततचे भांडणतंटे, ताणतणाव, तुटलेली नाती पाहून अनेक तरुण-तरुणी लग्नापासून दूर राहण्याचा विचार करत आहेत. ही परिस्थिती चिंताजनक असली, तरी त्यामागील कारणांचा अभ्यास करून योग्य दिशादर्शन करणे आवश्यक आहे.**



शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे

लहानपणापासूनच मुलं जे पाहतात, त्याचा त्यांच्या मनावर खोल परिणाम होत असतो. जर घरात आई-वडिलांमध्ये सतत वाद, अपमान, दुर्लक्ष किंवा मानसिक छळ होत असेल, तर मुलांच्या मनात विवाहसंस्थेबद्दल नकारात्मक भावना निर्माण होतात. "लग्न म्हणजे फक्त भांडण आणि तडजोड" अशी चुकीची समजूत त्यांच्या मनात घट्ट बसते. परिणामी, ते स्वतः त्या नात्यात अडकण्यापेक्षा दूर राहणंच पसंत करतात.

आजची तरुण पिढी आत्मनिर्भर आहे. शिक्षण, करिअर आणि आर्थिक स्थैर्य मिळवताना त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे त्यांना जोडीदाराकडूनही समानता, समजूतदारपणा आणि आदर अपेक्षित असतो. केवळ समाजाच्या दबावामुळे किंवा वय झालं म्हणून लग्न करण्याची मानसिकता आता कमी होत चालली आहे.

लग्न ही केवळ दोन व्यक्तींची नव्हे, तर दोन विचारांची सांगड असते. त्यामुळे एकमेकांना समजून घेणं, मनमोकळा संवाद ठेवणं आणि मतभेद असले तरी आदराने सोडवणं हा आदर्श असायला हवा.

नात्यात "कोण मोठं, कोण लहान" असा विचार नसावा. स्त्री-पुरुष समानतेवर आधारित नातं अधिक टिकाऊ आणि आनंदी ठरतं. निर्णय प्रक्रियेत दोघांचाही सहभाग असणे महत्त्वाचे आहे.

जोडीदारासोबत असताना मन शांत राहिलं पाहिजे. भीती, दबाव किंवा असुरक्षितता नसलेलं नातं हेच खऱ्या अर्थाने यशस्वी नातं असतं.

लग्नानंतरही प्रत्येक व्यक्तीला स्वतःचं व्यक्तिमत्त्व, आवडी-निवडी जपण्याचा अधिकार असतो. एकमेकांच्या स्वातंत्र्याचा आदर करणं आवश्यक आहे.

तडजोड म्हणजे स्वतःला सतत दाबणं नव्हे. तर समतोल साधणं महत्त्वाचं आहे. दोघांनीही काही गोष्टींमध्ये लवचिकता दाखवली, तर नातं अधिक मजबूत होतं.

लग्न टाळणं हा प्रश्नाचा कायमस्वरूपी उपाय नाही. उलट, योग्य व्यक्तीची निवड, योग्य मूल्यांवर आधारित नातं आणि परस्पर समजूतदारपणावर उभा केलेला संसार हा जीवन अधिक सुंदर करू शकतो. घरातील नकारात्मक अनुभवांमधून शिकून, त्याच चुका टाळून नवं सकारात्मक नातं निर्माण करणं हेच खऱ्या अर्थाने प्रगल्भतेचं लक्षण आहे.

आजच्या तरुण पिढीने लग्न ही परंपरा म्हणून नव्हे, तर एक जबाबदारी आणि सुंदर सहप्रवास म्हणून स्वीकारायला हवी. आदर्श विवाह म्हणजे परिपूर्ण नातं नव्हे, तर सतत शिकत, समजून घेत आणि एकमेकांना साथ देत पुढे जाणारा प्रवास आहे. भांडणं टाळणं शक्य नाही, पण त्यातून नातं अधिक मजबूत करणं शक्य आहे आणि हाच आजच्या पिढीने स्वीकारण्याचा खरा आदर्श ठरावा.

## ग्रामपंचायत, लिंगाळी ता, दौंड, जि. पुणे

**B1 पेपर नोटीस 1 सन २०२५/२०२६**

ग्रामपंचायत लिंगाळी, ता, दौंड, जि, पुणे यांच्याकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा) पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत लिंगाळी, ता, दौंड, जि, पुणे २२/०४/२०२६ ते दिनांक २५/०४/२०२६ कलावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत पोस्टाने अथवा समक्ष ग्रामपंचायतमध्ये स्विकारावी जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी / ग्रामपंचायत सोईनुसार घडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | वार्ड क्रमांक २ बंदिस्त गटर करणे. | ३५००००/- | २२/०४/२०२६ ते २५/०४/२०२६ | १००/- | सूट सु. बे. अ. |
| २ | वार्ड क्रमांक ६ बंदिस्त गटर करणे. | ३५००००/- | २२/०४/२०२६ ते २५/०४/२०२६ | १००/- | सूट सु. बे. अ. |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे : १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) यापूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत नावे धनादेश/डी.डी जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) यापूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश/डी.डी जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ६) आपण तांत्रिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदेबाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारनेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकारी ग्रामपंचायत लिंगाळी यांनी राखून ठेवला आहे.

ग्रामसेवक सरपंच
ग्रामपंचायत लिंगाळी, ता, दौंड, जि, पुणे

## महाविद्यालयात कायदेविषयक शिबीर संपन्न

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

आळेफाटा ता.जुन्नर येथील अनंतराव कणसे होमीओपॅथीक महाविद्यालयात (दि.१५ रोजी) सकाळी जुन्नरचे दिवाणी वरिष्ठ न्यायाधिश ए. एम. हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली मोफत कायदेविषयक शिबीर उत्साहात संपन्न झाले.




जिल्हा न्यायाधीश तथा जुन्नर तालुका विधी सेवा समितीचेअध्यक्ष एस.बी.शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण पुणे यांच्या वार्षिक कार्यक्रम पत्रिकेनुसार ह्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.सदर शिबीरात जुन्नर तालुका वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड हेमंत हाडवळे उपाध्यक्ष अॅड.निलीमा शेरकर,अॅड.वैशाली देवकर,अॅड. वर्षा टिंगरे,अॅड.कौशल पादीर,अॅड. आदेश घाटपांडे, अॅड. सौरव सोनवणे तसेच जुन्नर तालुका विधी सेवा समिती समन्वयक प्रशांत मोरतळे तसेच अनंतराव कणसे वैद्यकीय महाविलयाचे डॉ.कमलेश घोलप, डॉ.राशी मोरडीया तसेच डॉक्टर,प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबीराचे अध्यक्ष दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर ए. एम. हुसेन यांनी कायदेविषयक शिबिराचे औचित्य साधून कॉलेजमध्ये रॅगींगचे प्रकार घडत असतात. रॅगिंग करणे हा दंडात्मक गुन्हा आहे. रॅगिंग सारखे प्रकार कॉलेजमध्ये होता कामा नये. कॉलेजमध्ये विशाखा सारख्या समित्या स्थापन करणे आवश्यक आहे प्रत्येकांनी कायद्याचे पालन करावे त्यामुळे सुरक्षा व स्वातंत्र्य मिळते असे प्रतिपादन केले. यावेळी अॅड. वर्षा टिंगरे यांनी गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) या विषयावर, अॅड. कौशल पादीर यांनी लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायदा या विषयावर (पोस्को) तसेच महाराष्ट्र शासनाची मनोधैर्य योजना या विषयावर अॅड. वैशाली देवकर यांनी मार्गदर्शन केले. जुन्नर वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. हेमंत हाडवळे यांनी प्रास्तविक केले. सूत्रसंचालन डॉ राशी मोरडीया यांनी केले. प्रशांत मोरतळे समन्वयक तालुका विधी सेवा समिती यांनी आभार मानले.

## फ्लॅटचा व्यवहार ठरला, पण रक्कम न देताच परस्पर ताबा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

फ्लॅट खरेदीचा व्यवहार करून ठरलेली रक्कम न देताच, तसेच परस्पर फ्लॅटचा ताबा मिळवून फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार पुण्यात उघडकीस आला आहे. याप्रकरणी कोंढवा पोलिसांनी प्रवीण मंचलाल ओसवाल आणि भारती प्रवीण ओसवाल या दोघांवर भारतीय न्याय संहितेच्या कलम ३२९(३) अंतर्गत गुन्हा दाखल केला असून, हा गुन्हा पुढील तपासासाठी येवलेवाडी पोलीस स्टेशनकडे वर्ग करण्यात आला आहे. बांधकाम व्यावसायिक प्रकाश रामचंद्र जैन (५२, रा. गगन गॅलक्सी, बिबवेवाडी) यांनी याप्रकरणी कोंढवा पोलीस ठाण्यात (FIR क्र. ००३) तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जैन यांची कोंढवा परिसरात 'मंडोत टॉवर्स' नावाची इमारत आहे.

प्रवीण ओसवाल आणि जैन यांची जुनी ओळख असून, ओसवाल यांच्या भावांनी यापूर्वी जैन यांच्याकडून दोन फ्लॅट खरेदी केले होते. त्यामुळे जैन यांचा ओसवाल यांच्यावर विश्वास होता.



## थोडक्यात पण महत्वाचे




### ह्युंदाई मोटर आणि टीव्हीएस मोटर यांची भारतात औपचारिक भागीदारी

नवी दिल्ली(आरंभ पर्व) : ह्युंदाई मोटर कंपनी (ह्युंदाई मोटर) आणि टीव्हीएस मोटर कंपनी लि.(टीव्हीएस मोटर) यांनी भारतातील वाहतूकीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी खास तयार केलेल्या नाविन्यपूर्ण इलेक्ट्रिक थ्री व्हीलर (ई3डब्ल्यू) सोल्युशन्सच्या विकासाला आणि व्यापारीकरणाला चालना देण्यासाठी संयुक्त विकास करारावर (जॉईंट डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट) स्वाक्षरी केली आहे. भारत मोबिलिटी एक्स्पो 2025 मध्ये ई3डब्ल्यू संकल्पनेच्या सादरीकरणानंतर औपचारिक झालेली ही भागीदारी,भारतीय ग्राहकांसाठी त्यांच्या गरजेनुसार तयार केलेले वाहतूक उपाय आणण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.ही भागीदारी शाश्वत शहरी वाहतूकीसाठी दोन्ही कंपन्यांची वचनबध्दता अधिक दृढ करते. या करारानुसार ह्युंदाई मोटर आपल्या संशोधन व विकास क्षेत्रातील नैपुण्य,प्रगत गतिशीलता तंत्रज्ञान आणि मानव केंद्रित डिझाईन दृष्टीकोनाचा वापर करत ई3डब्ल्यूच्या डिझाईनचे नेतृत्व करेल व सहनिर्मिती करेल.



### जाखलेवाडीतील गरजूंना माऊली प्रतिष्ठानकडून कपडे वाटप

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : खेड तालुक्यातील साबुर्डी येथील जाखलेवाडीच्या ठाकरवाडीतील गरजू नागरिकांना माऊली सेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून कपड्यांचे मोफत वाटप करण्यात आले . राजगुरुनगर येथील माऊली सेवा प्रतिष्ठान हे नागरिकांकडून लहानांपासून ते वयोवृद्ध नागरिकांपर्यंत जुने परंतु वापरण्यायोग्य असलेले कपडे सामाजीक भावनेतून जमा करते. त्या कपड्यांचे अंदाजे वय आणि साईज नुसार विभागणी करून ते कपडे जिथे गरज असेल तिथे वाटप केले जातात. माऊली सेवा प्रतिष्ठानने मागील एक महिन्यात जमा केलेल्या २१ पोती कपड्यांचे वाटप खेड तालुक्यातील दुर्गम भागात असणाऱ्या साबुर्डी जवळील जाखलेवाडीत ठाकरवस्तीतील गरजु नागरिकांना केले. सुमारे दोनशे पेक्षा अधिक नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. गरजूंना कपडे मिळाल्यानंतर आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिरात होता. प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष कैलास दुधाळे, संचालक अविनाश पाटील, वासुदेव गोपाळे, चांगदेव ढमाले, संदीप होले, बाबाजी कातोरे, दिलीप राक्षे, सविता लोंढे यांनी कपडे वाटपाचे नियोजन सांभाळले. यावेळी साबुर्डी येथील सामाजिक कार्यकर्ते शंकर खंडागळे, प्रशांत बाळासाहेब गोपाळे, शांताराम तानाजी पाषाणकर, एकनाथ मारुती पाषाणकर, रामदास पाषाणकर , सचिन वाळुंज, बबन दगडु पाषाणकर, नामदेव भोते आदी मान्यवर उपस्थित होते.







# श्याम ग्लोबल टेक्नॉलॉजीचा ८वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

## संकटाचे संधीत रुपांतर करणे ही यशाची गुरुकिल्ली - नरेंद्र गोयल यांचे प्रतिपादन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संकटाच्या काळात कर्तृत्वाचा खरा कस लागत असतो. संकटाचे संधीत रूपांतर करणे हीच यशाची खरी गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन देशातील जनरेटर्स उत्पादनात आघाडीवर असलेल्या श्याम ग्लोबल टेक्नॉलॉजीचे संचालक नरेंद्र गोयल यांनी केले. कंपनीच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात गोयल बोलत होते. यावेळी महिंद्रा कंपनीचे जनरल मॅनेजर प्रॉडक्ट मॅनेजमेंट अमित देसाई, महिंद्राचे सीनियर जनरल मॅनेजर अंकुर श्रीवास्तव, महेश सरवणकर, श्याम ग्लोबलचे ऑपरेशन्स हेड गुलशन खजुरिया, रुची गोयल आदि मान्यवर आणि राज्यभरातील महिंद्रा जेनसेटचे प्रमुख वितरक आणि श्याम ग्लोबलचे कर्मचारी आणि अधिकारी आपल्या परिवारासह उपस्थित होते. कंपनीच्या आठ वर्षाच्या प्रवासात अनेक चढ-उतार अनुभवाला आले. आज श्याम ग्लोबल ही देशातील जनरेटर उत्पादन करणाऱ्या प्रमुख पाच कंपन्यांपैकी एक असली तरीही जनरेटर उत्पादनासह इतर काही क्षेत्रात कंपनीने कार्यविस्तार केला आहे. पुण्यासारख्या शहरांमध्ये असलेली पार्किंगची समस्या लक्षात घेऊन अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारावर 17 मजल्यापर्यंत स्वयंचलित पार्किंग यंत्रणा उभारण्याचे काम कंपनीमार्फत सुरू आहे. त्याचप्रमाणे अमेरिकेतील पीए रोबोटिक्स या कंपनीसाठी आम्ही रोबोट तयार करून त्याची निर्यात करत आहोत, असेही गोयल यांनी सांगितले.

केवळ सात कर्मचाऱ्यांच्या साथीने सुरू झालेल्या श्याम ग्लोबल या कंपनीने आठ वर्षात मोठी मजल मारली असून सध्या कंपनी 300 हून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. या वाटचालीचा आम्हाला अभिमान असून आगामी तीन ते पाच वर्षात तीन पट व्यवसाय वृद्धीचे लक्ष्य आम्ही ठेवले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कर्मचारी हे कंपनीचा कणा असून व्यावसायिक संबंध आणि व्यक्तिगत संबंध याचा समतोल साधण्याबाबत कंपनीत कटाक्ष पाळला जातो. सर्व अधिकारी आणि कर्मचारी हे श्याम ग्लोबल परिवाराचाच एक भाग आहेत, अशी आमची धारणा आहे. त्यांच्या सहभागाशिवाय कंपनी इतकी मोठी झेप घेऊ शकली नसती, याची आपल्याला जाणीव आहे, असे कंपनीच्या संचालिका रुची गोयल यांनी यावेळी सांगितले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी श्याम ग्लोबलच्या यशाचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तर कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी विविध मनोरंजनात्मक खेळांचा आनंद लुटला.

# युवक काँग्रेसतर्फे विचारप्रधान अभियान व लोकशाही संवाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समाजातील सध्याच्या वैचारिक, सामाजिक आणि शैक्षणिक आव्हानांना उत्तर देण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या वतीने राज्यभरात पाच विचारप्रधान अभियानाची सुरुवात करण्यात येणार असून, लोकशाही संवाद व्यासपीठाची स्थापना केली जाणार आहे. युवकांना जागरूक, संघटित व सक्रिय करून समाजात परिवर्तन घडवण्याच्या उद्देशाने हे अभियान महत्वाचे ठरणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष प्रथमेश आबनावे, प्रदेश सरचिटणीस भूषण रणभरे, पिंपरी चिंचवड युवक काँग्रेस अध्यक्ष कौस्तुभ नवले, प्रदेश सचिव अभिषेक अवचार, प्रियंका चौधरी आदी उपस्थित होते. शिवराज मोरे म्हणाले, "या उपक्रमांतर्गत डॉ. नरेंद्र दाभोलकर अभियान (वैज्ञानिक दृष्टिकोन), गोविंद पानसरे अभियान (सामाजिक न्याय), एम. एम. कलबुर्गी अभियान (विचार स्वातंत्र्य), रोहित वेमुला अभियान (विद्यार्थी समानता), गौरी लंकेश अभियान (सत्य व पत्रकारिता) असे पाच स्वतंत्र अभियान राज्यभर राबविण्यात येणार आहेत. डॉ. दाभोलकर अभियानाच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार केला जाईल. गोविंद पानसरे अभियानांतर्गत संविधानिक मूल्ये, समता आणि सामाजिक ऐक्य यावर भर दिला जाईल.

# अनोख्या ‘हिरो’ची मराठी सिनेसृष्टीत दमदार एंट्री

- **पदार्पणातच लागली या "हिरो"ला सचिन पिळगांवकर, मधुराणी गोखले सोबत झळकण्याची लॉटरी**
- **आगामी "कापूसकोंडा" चित्रपटातून तब्बल २२ वर्षांनी सचिन पिळगांवकर, मधुराणी गोखले पुन्हा एकत्र**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

चंदेरी दुनियेत ब्रेक मिळायला अनेक ऑडिशन्स द्याव्या लागतात. पण हा असा पहिला कलाकार आहे ज्याला ऑडिशन्स न देता थेट सुप्रसिद्ध अभिनेते सचिन पिळगांवकर आणि सुप्रसिद्ध अभिनेत्री मधुराणी गोखले यांच्यासोबत चित्रपटात काम करण्याची लॉटरी लागली आहे ते पण हिरो म्हणून. कोण आहे हा हिरो ? या हिरोच नाव आहे "कापूसकोंडा". हा एक गोंडस भुभु - कुत्रा आहे. आणि हेच या चित्रपटाचे मुख्य आकर्षण आहे. आज अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर "कापूसकोंडा' या चित्रपटाचे मोशन पोस्टर सोशल मीडियावर लाँच करण्यात आले आहे. "नवरा माझा नवसाचा" या गाजलेल्या चित्रपटात अभिनेते सचिन पिळगांवकर आणि अभिनेत्री मधुराणी गोखले दिसले होते. आता तब्बल २२ वर्षांनंतर "कापूसकोंडा"या आगामी चित्रपटातून पुन्हा एकदा एकत्र आले असून, बऱ्याच काळानंतर या चित्रपटाच्या निमित्ताने अभिनेत्री मधुराणी गोखले चित्रपटात कमबॅक करत आहे.

जास्वंद एंटरटेन्मेंट्स प्रा. लि. निर्मित "कापूसकोंडा" चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन सचिन मोहिते यांचं आहे. सचिन मोहिते, गणेश पंडित, ऋषिकेश तुरई यांनी चित्रपटाची पटकथा, संवादलेखन केलं आहे. सचिन पाटेकर यांनी छायांकनाची जबाबदारी निभावली आहे. संगीतकार ए. व्ही. प्रफुल्लचंद्र यांचे सुमधुर संगीत या चित्रपटाला लाभले असून चित्रपटाच्या गाण्यांना गायक अवधूत गुप्ते, पद्मनाभ गायकवाड यांचा स्वरसाज लाभला आहे. सुहास राणे यांनी ध्वनी तंत्रज्ञ म्हणून काम पाहिले आहे. अभिनेते सचिन पिळगांवकर व अभिनेत्री मधुराणी गोखले यांच्यासह नवीन पिढीतील अभिनेत्री अक्षता पाडगांवकर, जान्हवी तांबट आणि अभिनेता भूषण पाटील अशी उत्तम स्टारकास्ट या चित्रपटात पहायला मिळणार आहे. चित्रपटाचे बरेचसे चित्रीकरण कथानकाची गरज समजून लातूर जिल्ह्यातील अंधोरी या गावी करण्यात आले आहे.

# उच्चस्तरीय समितीवर खा. डॉ. अमोल कोल्हे यांची नियुक्ती

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील १२६ सदस्यीय राष्ट्रीय समितीत महाराष्ट्रातून मानाचे स्थान



**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त भारत सरकारकडून देशव्यापी स्मरणोत्सव साजरा करण्यात येणार असून, या उपक्रमासाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाने ११ मार्च २०२६ रोजी याबाबत अधिसूचना जारी केली असून, ती १३ एप्रिल रोजी प्रसिद्ध करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली १२६ सदस्यांची ही समिती स्थापन करण्यात आली आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त ११ एप्रिल २०२६ ते ११ एप्रिल २०२८ या कालावधीत देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्मरणोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक न्याय, समानता आणि सशक्तीकरणाच्या त्यांच्या विचारांना नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा उद्देश असल्याचे संस्कृती मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, फुले दाम्पत्याच्या कार्यावर आधारित ‘मी सावित्रीबाई फुले’ ही मालिका सध्या स्टार प्रवाह वाहिनीवर प्रसारित होत असून, या मालिकेचे १०० भाग नुकतेच पूर्ण झाले आहेत. या मालिकेच्या निर्मितीमुळे आणि फुले दाम्पत्याचा इतिहास जनतेपर्यंत पोहोचवण्याच्या प्रयत्नांमुळेच डॉ. कोल्हे यांची समितीवर नियुक्ती झाल्याचे मानले जात आहे.

याबाबत प्रतिक्रिया देताना खासदार डॉ. अमोल कोल्हे म्हणाले, “महात्मा फुलेंच्या २०० व्या जयंतीनिमित्त स्थापन झालेल्या या उच्चस्तरीय समितीवर माझी नियुक्ती होणे हा माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. त्यांच्या विचारांचा प्रसार तरुण पिढीत करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. या समितीच्या माध्यमातून त्या प्रयत्नांना अधिक बळ मिळेल.”

महाराष्ट्रातून या राष्ट्रीय समितीत स्थान मिळाल्याने डॉ. कोल्हे यांच्यावर महात्मा फुलेंचे कार्य राष्ट्रीय स्तरावर प्रभावीपणे पोहोचवण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

# दररोज ॲन्टॅसिडची गोळी आरोग्यासाठी धोकादायक?

**हैदराबाद (दै. आरंभ पर्व)**

जड अन्न खाल्ल्यानंतर छातीत जळजळ होणे, आम्लपित्त (acidity) वाढणे किंवा पोटात अस्वस्थता जाणवणे—या सगळ्यांसाठी अनेकजण लगेच ॲन्टॅसिडची गोळी घेतात. सहज उपलब्ध असल्यामुळे या गोळ्या लोकांच्या दैनंदिन सवयीचा भाग बनल्या आहेत. काही जण तर महिनोनमहिने, कधी कधी वर्षानुवर्षे डॉक्टरांचा सल्ला न घेता या औषधांचा वापर करत राहतात. मात्र ही सवय निरुपद्रवी नाही, असा इशारा मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे तज्ञ देत आहेत. विशेषतः वर्ल्ड लिव्हर डेच्या पार्श्वभूमीवर, केवळ लक्षणे दाबण्याऐवजी त्यामागील कारण शोधणे किती महत्त्वाचे आहे याकडे ते लक्ष वेधत आहेत. अलीकडच्या काळात हृदयविकार, मधुमेह किंवा किडनीच्या समस्यांसोबतच, दीर्घकाळ ॲन्टॅसिडचा वापर केल्यामुळे उद्भवलेल्या गुंतागुंतींसह रुग्णांची संख्या वाढताना दिसत आहे. भारतातील रुग्णांपैकी निम्म्याहून अधिक जणांना आयुष्यात कधीतरी ॲन्टॅसिड दिले जाते. परंतु त्यापैकी सुमारे 30% लोक हे औषध आवश्यकतेपेक्षा जास्त काळ घेत राहतात. अनेकजण डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय थेट मेडिकल स्टोअरमधून या गोळ्या घेतात. विशेषतः हृदयाच्या औषधांसोबत ॲन्टॅसिड घेणाऱ्या रुग्णांना, हे औषध कधी थांबवायचे याबद्दल योग्य मार्गदर्शन मिळत नाही. आपल्या पोटातील आम्ल हे फक्त अन्न पचवण्यासाठी नसून, शरीराला आवश्यक असलेले खनिजे आणि जीवनसत्त्वे शोषून घेण्यासाठीही अत्यंत महत्त्वाचे असते. हे आम्ल सतत औषधांनी कमी केल्यास, शरीराला आवश्यक पोषक घटक मिळणे कमी होते आणि त्याचे दुष्परिणाम हळूहळू दिसू लागतात.

# महाराष्ट्रातील स्मार्ट शेतीच्या विकासाला मिळणार 'बूस्टर'

## दावोसमधील सामंजस्य करारांतर्गत पुण्यातील न्यूट्रीफ्रेश फार्म्सला ९० कोटींची परदेशी गुंतवणूक प्राप्त



> 'डीएफसी'ची ही गुंतवणूक आमच्या दावोस येथील वचनबद्धतेचे प्रत्यक्ष कृतीत रूपांतर करण्याच्या दिशेने पडलेले महत्वाचे पाऊल आहे. अशा भागीदारींच्या माध्यमातून आम्ही अचूक शेतीकडे होणारा बदल अधिक वेगाने घडवून आणत आहोत, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवत आहोत आणि जागतिक अन्न प्रणालीत महाराष्ट्राची भूमिका अधिक मजबूत करत आहोत.”
>
> - देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राच्या विकासासाठी अमेरिकेतील इंटरनॅशनल डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन (यूएसआयडीएफसी) संस्थेकडून ९० कोटींची गुंतवणूक प्राप्त झाली आहे. दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्र शासन, रूरल एन्हान्सर्स आणि न्यूट्रीफ्रेश फार्म्स यांच्यात नियंत्रित वातावरणातील शेती यासाठी नुकताच २५०० कोटी रुपयांचा सामंजस्य करार झाला होता. त्यातील ४०० कोटी रुपयांची गुंवणूक अमेरिकेतून येणार होती आणि त्यापैकी ही ९० कोटींची पहिली गुंतवणूक आली आहे. त्यातून पुणे जिल्ह्यातील भोर, पुरंदर आणि नागपूर येथे प्रकल्प कार्यान्वित होणार आहेत, अशी माहिती रूरल एन्हान्सर्सचे संस्थापक व सीईओ अंबर आयदे यांनी सांगितली. या गुंतवणुकीमुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवण्याच्या दृष्टीकोनाला ठोस जागतिक मान्यता मिळाली असल्याचेही त्यांनी नमूद केले. जागतिक स्तरावर तणाव आणि अनिश्चिततेचे वातावरण असतानाही महाराष्ट्रातील कृषी व अन्नसुरक्षा क्षेत्रावर जागतिक गुंतवणूकदारांकडून विश्वास दाखवला जात असल्याचे हे प्रतीक आहे. स्मार्ट शेतीसाठी झालेल्या सामंजस्य करारानंतर महाराष्ट्राला मिळालेली ही पहिली थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) आहे. या निधीद्वारे अत्याधुनिक कृषी पायाभूत सुविधा उभारणी, तंत्रज्ञान-आधारित शेती प्रणालींचा विस्तार आणि निर्यात-केंद्रित कृषी पुरवठा साखळी बळकट करण्यात येणार आहे. यामुळे महाराष्ट्र उच्च कार्यक्षमतेच्या आणि तंत्रज्ञानाधारित शेतीसाठी जागतिक केंद्र म्हणून उदयास येईल. यासह उत्पादनक्षमता, पाणी वापर कार्यक्षमता आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मोठी चालना मिळणार आहे. महाराष्ट्र आता हवामान-प्रतिरोधक कृषी आणि अन्न प्रणाली क्षेत्रातील जागतिक गुंतवणुकीसाठी अग्रक्रमाचे राज्य म्हणून अधिक बळकट होईल, असे अंबर आयदे यांनी सांगितले. न्यूट्रीफ्रेश फार्म्सचे सहसंस्थापक गणेश निकम म्हणाले, या भांडवली गुंतवणुकीमुळे नियंत्रित वातावरणीय शेती (सीईए) पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळणार आहे. यामुळे अचूक तंत्रज्ञानाधारित शेती, पाण्याचा कार्यक्षम वापर आणि पिकांच्या उत्पादनक्षमतेत वाढ साध्य होईल. तसेच, या उपक्रमाद्वारे निर्यातक्षम कृषी पुरवठा साखळी अधिक बळकट करण्याचे उद्दिष्ट असून, राज्याला उच्च कार्यक्षमतेच्या शेतीचे केंद्र म्हणून विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. न्यूट्रिफ्रेश फार्म्सचे सह-संस्थापक संकेत मेहता यांनी सांगितले की, रूरल एन्हान्सर्स ग्रुपचे अंबर आयदे यांच्या नेतृत्वाखालील भागीदारीमुळे प्रत्यक्ष पातळीवर प्रभावी परिणाम दिसून येतील. येत्या काही महिन्यांत महाराष्ट्राला या उपक्रमाचे ठोस परिणाम अनुभवायला मिळतील.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.